नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०४/२०२६ ( मंगळवार )**

---

# अवघ्या ५ तासात घरफोडीचा गुन्हा उघड,२ आरोपी अटक, २ लाख २९ हजार ८०० रूपये रोख रक्कम जप्त रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दिनांक २७/०४/२०२६ रोजी परसोडा येथील फ्लिपकार्ट कंपनीचे मॅनेजर फिर्यादी नामे निलेश अरूण मोहबिया ,वय ३३ वर्ष, रा.आझाद वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि.नागपूर यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, फिर्यादीचे ऑफिसचे लॉक तोडुन ऑफसमधील टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले रोख रक्कम एकूण २,३२,०८०/—रूपये आणि ऑफिसचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे डीव्हीआर किंमती ९,०००/—रूपये असा एकुण २,४१,०८० /—रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञान व्यक्तीने चोरून नेला आहे. सदर प्रकरणी रामटेक येथे पोलीस स्टेशन येथे घरफोडी च्या कलमान्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री रमेश बरकते, उपवभिागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या मार्गदर्शनात रामटेक पोलीसांनी तांत्रिक पुराव्यांचे योग्य विश्लेषन करून **अवघ्या ५ तासात** दिनांक २७/०४/२०२६ रोजी फिर्यादीचे ऑफिसमध्ये काम करणारा आरोपी **क्रं १) ऋषभ प्रभाकर धमगाये, वय ३० वर्षे, रा.आंबेडकर चौक, रामटेक याला आणि त्याचा साथीदार आरोपी क्रं २) सहील साहेबराव पडगिलवार, वय २१ वर्षे, रा. आंबेडकर चौक रामटेक यांना त्याच्या राहत्या परीसरातुन आंबेडकर चौक**

**रामटेक येथुन** ताब्यात घेवुन नमुद आरोपींकडे पोलीसांनी सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी मिळुन नमुद गुन्हा केल्याबाबत कबुली दली.

**रामटेक पोलीसांनी नमुद दोन्ही आरोपीतांना अटक करून त्यांचे कडुन गुन्हयात चोरीस गेलाली रोख रक्कम २,२९,८००/— रूपये जप्त केले आहे. मा. न्यायालयाने दोन्ही आरोपीतांना दिनांक ३०/०४/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड सुनावली आहे.**




**गुन्हा उघड करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# बस मध्ये चढतांना हातसफाईने चोरी करणारे २ आरोपी अटक
# २ गुन्हे उघड, ३० हजार रोख रक्कम जप्त
# काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत दिनांक ०२/०४/२०२६ रोजी दुपारच्या सुमारास बस स्थानक काटोल येथे बस मध्ये चढतांना एका व्यक्तीच्या खिशातुन अज्ञात आरोपींनी १५,०००/— रूपये काढल्याची घटना घडली होती. तसेच दिनांक २३/०४/२०२६ चे १३/३० ते १४/३० वा दरम्यान पुन्हा काटोल बस स्थानक येथे कारंजा बस मध्ये चढत असतांना एका वृध्दाच्या खिशातुन ३२,००० /—रुपये अज्ञात चोरटयांनी चोरून नेले. दोन्ही गुन्हयात एकुण ४७,०००/—रुपयांचा मुद्देमाल चोरी गेला होता. नमुद दोन्ही प्रकरणी पोलीस स्टेशन काटोल येथे अनुक्रमे अप क्रं ३७५/२०२६ आणि अप क्रं ४९७/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी सदर गुन्हयांचा सखोल तपास करीत तांत्रिक पुरावे आणि गुप्त गुप्तबातमीदाराच्या माहीतीच्या अधारे दिनांक २६/०४/२०२६ रोजी **आरोपी क्रं १) लुकमान शाह हबीब शाह, वय ५५ वर्ष, रा. अहमदिया मज्जिद मागे, इक्बाल कॉलनी, अमरावती आणि आरोपी क्र २) रौफ सुजात खान, वय ५९ वर्ष, रा. अन्सार नगर रज्जा मज्जिद मागे, अमरावती यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले.** नमुद दोन्ही आरोपींना अमरावती येथुन ताब्यात घेवुन त्यांचे कडे कौशल्यपुर्ण तपास करीत विचारपुस केली असता त्यांनी नमुद दोन्ही गुन्हे केल्याची कबुली दिली.

**पोलीसांनी आरोपींना दिनांक २७/०४/२०२६ रोजी अटक करून आरोपीतांच्या ताब्यातुन अप क्रं ४२७/२०२६ मधील १८,०००/— रूपये आणि अप क्रं ३७५/२०२६ १२,०००/— रूपये अशी चोरीस गेलेली एकुण रोख रक्कम ३०,०००/—रुपये जप्त करण्यात आले आहे.**

# क्रिकेट सट्टा /बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्याविरूध्द गुन्हा नोंद ३५ हजार २७० रूपयाचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल:—** दिनांक २६/०४/२०२६ रोजी काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, आय. यु. डी. पी. काटोल येथे राहणारा संगम महाजन हा किसन बार काटोल येथे बसुन इंडीयन प्रिमीयर लीग २०२६ या सिरीजमधील वेगवेगळया संघादरम्यान खेळल्या जाणाऱ्या लाईव्ह क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता किसन बार काटोल येथे **आरोपी नामे संगम युवराज महाजन, वय ३१ वर्ष, रा. आय. यु. डी. पी. काटोल हा मिळुन आला.** सदर आरोपीने अँड्रॉइड मोबाईल मध्ये १२ विविध बेटींग आयडी तयार करून बेटींग साईटवरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले.

**पंचासमक्ष अरोपीच्या ताब्यातुन १) ॲड्रॉईड मोबाईल किंमती ३५,०००/— रुपये. २) रोख रक्कम २७०/— रुपये असा एकूण ३५,२७०/— रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे संगम युवराज महाजन, वय ३१ वर्ष, रा. आय. यु. डी. पी. काटोल यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

# अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांना पायदळ घेवुन जाणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद
# २ गोवंश जनावरांची सुटका, बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक २७/०४/२०२६ रोजी बेला पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, ०२ इसम हे चिमणाझरी गावाकडुन सिंधी रेल्वे येथे दोन पांढ—या रंगाचे बैल निर्दयतेने बांधुन त्यांची चारापाण्याची सोय न करता कत्तली करीता पायदळ घेवुन जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा चिमणाझरी जवळ सापळा रचुन कारवाई केली असता दिनांक २७/०४/२६ चे १५/१० ते १६/२० वाजेच्या सुमारास ०२ इसम निर्दयतेने गोवंश जनावरे घेवुन येतांना दिसले. पोलीसांनी त्यांना नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १) अशोक नागोराव बावणे, वय ५० वर्ष, रा. सिंधी रेल्वे पडसगांव, ता. सेलु, जि. वर्धा ०२) ज्ञानेश्वर लक्ष्मणराव वरगणे, वय ४५ वर्ष, रा. सिंधी रेल्वे पडसगांव, ता. सेलु, जि. वर्धा** अशी माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांना जनावरांच्या पावत्यांबाबत विचारना केली असता त्यांच्याकडे जनावरांबाबत काहीही कागदपत्रे नव्हती.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ०२ बैल जनावरांची सुटका करण्यात आली. नमुद आरोपी विरूध्द कलम ४९ भान्यासं सहकलम ११, ५ (बी) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम गुन्हा नोंद केला असुन पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

**दिनांक २७/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी क्रं १) पप्पु बाबुलाल गौढ, वय ३२ वर्ष, रा. साईबाबा मंदीर तोरवा, ता. तोरवा, जि. बिलासपुर छत्तीसगड, ह. मु. सावळी, ता. कामठी हा भोवरी रोड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच सावळी फाटा येथे आरोपी क्रं २) पुष्पराज रमन व्दिवेदी, वय ३८ वर्ष, रा. मेडरा रोड, अहीरान टोला ताला विदयालय के पास, ग्रामपोस्ट ताला, ता. मझौली, जि. सिंधी मध्यप्रदेश हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत मौजा परसोडी बस स्टॉप जवळ केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी भगवान वसंता तिरगुडे, वय ४९ वर्ष, रा. वार्ड क्र ६, सातनुर पोस्ट पारडसिंगा, ता. सौंसर, जि. पांढुर्णा हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री , वाहतुक करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २६ गुन्हे नोंद

दिनांक २७/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू तसेच चारचाकी वाहन, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा तसेच इतर साहित्य असा एकुण ७,३२,६५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १) हरीश वामनराव कटुकाळे, वय २८ वर्ष, रा. रामाडेश्वर वार्ड, रामटेक २) बैलेष जगदीष भाँडे, वय ४५ वर्षे, रा. रामेश्वर वार्ड, रामटेक ३) गोकुळ नारायण पाटील, रा. रामटेक जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा, तसेच आरोपी १) महेश राजू केळवदे, रा. आमडी, ता. रामटेक, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी १) सियाराम हल्दीराम तुमडाम, वय ३६ वर्ष, रा. कोथुळना, त. सावनेर २) पांडुरंग मारोतराव लोहकरे, वय ७३ वर्ष, रा. करंभाड, त. पारशिवनी याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपी** नामे चंद्रशेखर शिवाजी सलाम, वय ५० वर्ष, रा. पारडसिंगा, ता. काटोल यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपी** १) विनोद हरीचंद्र भांगे, वय ३२ वर्ष, रा. पांजराकाटे २) ०३ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ असे ०४ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे प्रदीप चुन्नीलाल बावत्रे, वय ४५ वर्ष, रा. गुमगाव माईन खापा २) किशोर घनश्याम पिरेवार, वय ३७ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपुर ३) ०१ महिला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे सुखदेव गवतुजी बांगडे, वय ६२ वर्ष, रा. मंगसा, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) कमलेश रत्नाकर गराड, वय ३९ वर्ष, रा. रिलायंस पेटोलपंपच्या मागे, वरोरा चंद्रपुर ह.मु. मस्के गुरुजी यांचे घरी वाघोडा, ता. सावनेर २) राजकुमार उर्फ राजु अमरसींग पटेल, वय ४० वर्ष, रा. मानेगाव (टाकळी), ता. सावनेर ३) जितेंद्र शिवशंकर चौधरी, वय ४० वर्ष, रा. बजाज कॉलोनी डब्लुसीएल वाघोडा, ता. सावनेर

यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद,४) मोहन मणिराम दहिहंडे, वय ५२ वर्ष, रा. वार्ड नं. १२, सावनेर २) अमोल श्रावणजी ठाकरे, वय ३८ वर्ष, रा. वार्ड नं. ०२, निळगाव ३) रामराव परसराम खवसे वय ६१ वर्ष रा. निळगाव ४) प्रतिक भुमेश्वर खोरगडे, वय ३१ वर्ष, रा. वार्ड नं. १५, सावनेर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी योगेश तुकाराम सहारे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. १४, चिचपुरा सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे भागवत मारोती ठाकरे, वय ५४ वर्ष, रा. फेगड, ता. कुही, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी १) राहुल चंद्रभानजी चौधरी, वय २९ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड २) दिपक वनराज चाहादे, वय ४० वर्ष, रा. सेव उमरेड ३) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे रितेश रुपचंद राउत, वय ५१ वर्ष, रा. वार्ड क्र.०४, भिमनगर कुही याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ६५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ८०० लिटर मोहाफुल सडवा व इतर साहित्य ३) १८९००० मिली देशी दारू व ०१ चारचाकी वाहन असा एकुण ७,३२,६५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १५ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १३ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६९ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४० आरोपी

आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने